मुदत संपणाऱ्या कन्हान-पिपरी व गडचांदूर या २ नगर परिषदा व लांजा नगरपंचायतीच्या अध्यक्ष/सदस्य पदांच्या सार्वत्रिक व कळमेश्वर नगर परिषदेच्या हद्दवाढ क्षेत्राची तसेच अन्य नगरपरिषदा / नगरपंचायतींमधील ५ रिक्त सदस्य पदांच्या पोटनिवडणुकांसाठी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम - २०१९-२०

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/नप-२०१९/प्र.क्र.१३/का.६

**निवडणूक प्राथम्य**
**ई-मेल**

नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १०/१२/२०१९.

प्रति,

जिल्हाधिकारी,
रत्नागिरी, पुणे, नाशिक, जळगाव, अहमदनगर,
बुलढाणा, नागपूर व चंद्रपूर.

**विषय :-** मुदत संपणाऱ्या कन्हान-पिपरी व गडचांदूर या २ नगर परिषदा व लांजा नगर पंचायतीच्या अध्यक्ष व सदस्य पदांच्या सार्वत्रिक व कळमेश्वर नगर परिषदेच्या हद्दवाढ क्षेत्राची तसेच अन्य नगर परिषदा / नगरपंचायतींमधील रिक्त सदस्य पदांच्या पोट निवडणुकांसाठी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम-२०१९-२०.

**संदर्भ :-** १) आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०१८/प्र.क्र.९/का-६,दि. १६/११/२०१९ चे आदेश.
२) आयोगाचे क्र.रानिआ/नप-२०१९/प्र.क्र.६/का-६, दि. २८/११/२०१९ चे आदेश.
३) महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१६.
४) महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१७.

**महोदय/महोदया,**

सोबतच्या परिशिष्ट-२ मधील नमूद मुदत संपणाऱ्या कन्हान-पिपरी व गडचांदूर या २ नगर परिषदा व लांजा नगरपंचायतीच्या अध्यक्ष/सदस्य पदांच्या सार्वत्रिक व कळमेश्वर नगरपरिषदेच्या हद्दवाढ क्षेत्राच्या निवडणुकांकरिता प्रभाग रचना, आरक्षण व सोडत शासन राजपत्रात अंतिमरित्या प्रसिध्द झालेली असून या ३ नगर परिषदा/नगर पंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुका व कळमेश्वर नगर परिषदेच्या हद्दवाढ क्षेत्राची तसेच अन्य नगर परिषदा / नगरपंचायतींमधील ५ रिक्त सदस्य पदांच्या पोट निवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम देण्यात आला होता. त्यानुसार अंतिम प्रभाग निहाय मतदार याद्या अधिप्रमाणित करुन दिनांक १०/१२/२०१९ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहेत.

२. त्यानंतर आयोगाकडून संदर्भाधीन अ.क्र. १ येथील आदेशान्वये **परिशिष्ट-२ मधील कन्हान-पिपरी** व **गडचांदूर** या २ नगर परिषदा व **लांजा** नगरपंचायतीच्या अध्यक्ष व सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्याकरिता पूर्वतयारीबाबत सविस्तर सूचना देण्यात आलेल्या आहेत.

३. राज्य शासनाने संदर्भाधीन अ.क्र. ३ येथील अध्यादेश प्रख्यापित केला असून त्यानुसार "महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१६ (सन २०१६ चा अध्यादेश क्रमांक १६ )", दि.३०/०८/२०१६ अन्वये नगर परिषदांच्या नगराध्यक्षांची निवड थेट जनतेमधून करण्याची पध्दती लागू केली आहे. तसेच दि.०४/१०/२०१६ रोजीच्या अधिसूचनेद्वारे अध्यक्ष पदाचे निवडणूक नियम, २०१६ शासन राजपत्रात प्रसिध्द केले असून निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नगर परिषदेच्या अध्यक्ष पदाच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्राप्त होणाऱ्या नामनिर्देशनपत्रावर कार्यवाही करावी.

**४.** राज्य शासनाने संदर्भाधीन अ.क्र. ४ येथील अध्यादेश प्रख्यापित केला असून त्यानुसार "महाराष्ट्र नगर **परिषदा, नगर पंचायती** व औद्योगिक नगरी (सुधारणा) अध्यादेश, २०१७ (सन २०१७ चा अध्यादेश क्रमांक २५)" **दिनांक ०२/११/२०१७** अन्वये नगरपंचायतींमधील नगराध्यक्षांची निवड थेट जनतेमधून करण्याची पध्दती **लागू केली आहे**. तसेच दि.१३/११/२०१७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे अध्यक्ष पदाचे निवडणूक नियम, २०१७ शासन राजपत्रात प्रसिध्द केले असून निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नगर पंचायतीच्या अध्यक्ष पदाच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्राप्त होणाऱ्या नामनिर्देशनपत्रावर कार्यवाही करावी.

५. राखीव जागेवर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तथापि, जातवैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास त्यांनी पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची पोचपावती नामनिर्देशन पत्रासोबत सादर करण्याची त्यांना मुभा देण्यात आली आहे. शासनाने सन २०१९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. २० अन्वये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम ९ अ व ५१-१ब मध्ये केलेली सुधारणा जी दिनांक २२ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या राजपत्रात प्रसिध्द झाली आहे, त्यानुसार अशा उमेदवारांनी निवडून आल्याचे घोषित झाल्याच्या दिनांकापासून बारा महिन्याच्या आत जातवैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास

त्यांची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्याबाबत तरतुद करण्यात आलेली आहे. या संदर्भात उमेदवाराकडून नामनिर्देशनपत्रासोबत विहित केलेले याबाबतचे हमीपत्र घेण्यात यावे. (अध्यादेशाची प्रत सोबत जोडली आहे.)

६. आता, या पत्रान्वये **कन्हान-पिपरी** व **गडचांदूर** या २ नगर परिषदा व **लांजा** नगरपंचायतीच्या अध्यक्ष व सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता व **कळमेश्वर** नगरपरिषदेच्या हद्दवाढ क्षेत्राची तसेच अन्य नगरपरिषदा/नगरपंचायतींमधील रिक्त सदस्य पदांच्या पोट निवडणुकांकरिता प्रत्यक्ष निवडणुकीचा कार्यक्रम **परिशिष्ट-१** प्रमाणे जाहीर करण्यात येत आहे. सार्वत्रिक/पोट निवडणुका असलेल्या नगर परिषदा / नगर पंचयातींचा तपशील **परिशिष्ट-२** नुसार आहे.

७. राज्य निवडणूक आयोगाने उमेदवारांना नामनिर्देशनपत्र व शपथपत्र सहजरितीने भरता यावे यासाठी महाऑनलाईनच्या मदतीने एक सॉफ्टवेअर तयार केलेले आहे. सर्व सभाव्य उमेदवारांनी सॉफ्टवेअरद्वारेच नामनिर्देशनपत्र व शपथपत्रातील माहिती भरणे आवश्यक आहे. त्यांनी http://panchayatelection.maharashtra.gov.in या वेबसाईटवर जाऊन त्यामध्ये स्वत:ची नोंदणी (Register) करुन घ्यावी व नामनिर्देशनपत्रामध्ये तसेच शपथपत्रामध्ये माहिती भरावी. त्यावर स्वाक्षरी करुन ते निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे विहित वेळेत व विहित पध्दतीने दाखल करावे. अशा प्रकारे भरलेला व स्वाक्षरी केलेला नामनिर्देशन पत्राचा अर्ज नामनिर्देशनपत्र म्हणून ग्राह्य धरण्यात येईल.

८. निवडणुकीची आचारसंहिता आजपासून लागू झाली असून ती निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यंत अंमलात राहील. वरील आचारसंहिता सार्वत्रिक निवडणूक असलेल्या संपूर्ण संबंधित नगर परिषद/नगर पंचायतीच्या क्षेत्रामध्ये व **कळमेश्वर-ब्राम्हणी** नगरपरिषदेच्या हद्दवाढ क्षेत्राची निवडणूक असल्यामुळे हे हद्दवाढ क्षेत्र समाविष्ट झालेल्या प्रभागात तसेच अन्य नगर परिषदा/नगर पंचायतींच्या रिक्त सदस्य पदांची पोटनिवडणूक असलेल्या संबंधित प्रभागात लागू राहील. उपरोक्त क्षेत्रातील मतदारांवर विपरित प्रभाव टाकणारी कोणतीही कृती / घोषणा कोणत्याही मंत्री, खासदार, आमदार, नगरसेवक किंवा इतर पदाधिकाऱ्यांना इतरत्र सुध्दा करता येणार नाही.

९. सार्वत्रिक निवडणूक असलेल्या नगर परिषदा / नगर पंचायतीच्या प्रभाग रचना व सार्वत्रिक/ हद्दवाढ क्षेत्र तसेच पोट निवडणूक असलेल्या नगर परिषदा / नगर पंचायतींच्या मतदार यादीसंदर्भात

न्यायालयात याचिका दाखल झाल्या असल्यास याबाबतची खातरजमा करुन न्यायालयाच्या आदेशानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील. तसेच कोणत्याही रिट याचिकेमध्ये मा. न्यायालयाचे स्थगिती आदेश प्राप्त झाल्यास निवडणूक कार्यक्रम तात्काळ रद्द / स्थगित करुन तसे आयोगास अवगत करावे.

१०. राज्य निवडणूक आयोगाच्या संदर्भाधीन दिनांक १६/११/२०१९ रोजीच्या व इतर पत्रातील सूचनांनुसार काटेकोरपणे कार्यवाही करण्यात यावी.

११. सदर निवडणूक कार्यक्रम आयोगाच्या https://www.mahasec.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

**सहपत्र- परिशिष्ट-१ व २**

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :-
१) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
३) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
४) मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
५) प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
६) पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
८) विभागीय आयुक्त, कोकण, पुणे, नाशिक, अमरावती व नागपूर विभाग.
९) संबंधित जिल्हा पोलिस अधिक्षक
१०) संबंधित नगर परिषदा व नगर पंचायतींचे प्रशासक व मुख्याधिकारी
११) संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई- ४०० ००४.
१२) राज्य निवडणूक आयोगाच्या पॅनलवरील सर्व वकील
१३) प्रभारी उपायुक्त, संगणक कक्ष, राज्य निवडणूक आयोग, मुबंई.
१४) माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
१५) राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यालयातील सर्व कार्यासने
१६) निवड नस्ती (का.६), राज्य निवडणूक आयोग, मुंबई.

C:\Users\...\Desktop\नांदेड-वाघाळा मनपा.docx

## परिशिष्ट -१ (सार्वत्रिक/पोट निवडणुकांसाठी)

**(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्र.रानिआ/नप-२०१९/प्र.क्र.१३/का.६, दि.१०/१२/२०१९ सोबतचे सहपत्र.)**

(i) मुदत संपणाऱ्या **कन्हान-पिपरी व गडचांदूर** या २ नगरपरिषदा व **लांजा** नगरपंचायतीच्या अध्यक्ष व सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुका-२०१९-२०

(ii) **कळमेश्वर-ब्राम्हणी** नगरपरिषदेच्या हद्दवाढ क्षेत्राकरिता निवडणूक-२०१९-२०

(iii) नगर परिषदा / नगरपंचायतींमधील सोबतच्या **परिशिष्ट-२** मधील नमूद ५ रिक्त सदस्य पदांच्या पोट निवडणुका-२०१९-२०.

| अ.क्र. | निवडणूकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची/संपविण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | अंतिम प्रभागनिहाय मतदार याद्या अधिप्रमाणित करुन प्रसिध्द करण्याचा दिनांक | १०/१२/२०१९ (मंगळवार) |
| २ | जिल्हाधिकाऱ्यांनी निवडणूक कार्यक्रम जारी करण्याची तारीख | १३/१२/२०१९ (शुक्रवार) |
| ३ | नामनिर्देशनपत्र राज्य निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या वेबसाईटवर भरण्याकरीता उपलब्ध असण्याचा कालावधी. | १६/१२/२०१९ (सोमवार) सकाळी ११.०० ते २०/१२/२०१९ (शुक्रवार) दुपारी ०२.०० पर्यंत |
| ४ | वरील नामनिर्देशनपत्रे स्विकारण्याचा कालावधी | १६/१२/२०१९ (सोमवार) ते २०/१२/२०१९ (शुक्रवार) (सकाळी ११.०० ते दुपारी ०३.०० पर्यंत) |
| ५ | नामनिर्देशनपत्राची छाननी व वैधरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | २१/१२/२०१९ (शनिवार) सकाळी ११.०० वाजल्यापासुन |
| ६ | नामनिर्देशनपत्रे मागे घेण्याचा अंतिम दिनांक **अपील नसेल तेथे** | २७/१२/२०१९ (शुक्रवार) दुपारी ०३.०० वाजेपर्यंत |
| ६-अ | **अपील असल्यास**<br>(i) वैधरित्या नामनिर्देशित केलेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून तीन दिवसांच्या आत, जिल्हा न्यायाधिशाकडे अपिल करता येईल.<br>(ii) निवडणूक निर्णय अधिकारी यानी अपिलाचा निर्णय लवकरात लवकर प्राप्त करुन घेण्यासाठी प्रयत्न करावेत. | अपिलाचा निर्णय ज्या तारखेस करण्यात येईल त्या तारखेनंतर तिसऱ्या दिवशी किंवा तत्पूर्वी. मात्र दिनांक ३०/१२/२०१९ (सोमवार) पर्यंत. |
| ७ | निवडणूक चिन्ह नेमून देण्याचा तसेच अंतिमरित्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | उमेदवारी मागे घेण्यासाठीच्या शेवटच्या दिवसानंतरच्या लगतच्या दिवशी |
| ८ | आवश्यक असल्यास मतदानाचा दिनांक | ०९/०१/२०२० (गुरुवार) सकाळी ७.३० पासून ते सायंकाळी ५.३० पर्यंत |
| ९ | मतमोजणी व निकाल जाहीर करण्याचा दिनांक | १०/०१/२०२० (शुक्रवार) सकाळी १०.०० वाजल्यापासून |
| १० | महाराष्ट्र शासन राजपत्रात **निकाल प्रसिध्द करणे** | कलम १९ आणि ५१-अ-१अ (९) मधील तरतुदींनुसार |

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या **आदेशानुसार,**

(किरण कुरुंदकर)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

# नगर परिषदा / नगर पंचायतींची नावे

## परिशिष्ट - २ (सार्वत्रिक/पोट निवडणुकांसाठी)

(राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक रानिआ/नप-२०१९/प्र.क्र.१३/का-६, दि.१०/१२/२०१९ सोबतचे सहपत्र.)

| अ.क्र. | जिल्हा | नगर परिषदा/नगर पंचायतींचे नावे | नगरपरिषदा/नगर पंचायतींच्या मुदत समाप्तीचा व हद्दवाढ झाल्याचा दिनांक | न.प./न.पं. च्या रिक्त सदस्य पदांची पोट निवडणूक असलेले प्रभाग व जागा क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | रत्नागिरी | लांजा | १०/०२/२०२० | -- |
| २ | पुणे | -- | -- | तळेगाव-दाभाडे - ७-ब |
| ३ | नाशिक | -- | -- | देवळा - ११ |
| ४ | जळगाव | -- | -- | भुसावळ- २४- अ |
| ५ | अहमदनगर | -- | -- | नेवासा-१३ |
| ६ | बुलढाणा | -- | -- | नांदुरा - ७-ब |
| ७ | नागपूर | कन्हान-पिपरी | १९/०२/२०२० | -- |
| | | कळमेश्वर-ब्राम्हणी (हद्दवाढक्षेत्र) | ११/१०/२०१७ | -- |
| ८ | चंद्रपूर | गडचांदूर | १९/०२/२०२० | -- |
| | एकूण | ४ | | ५ |